**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ**
**भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ**

फोन नं. ०२२-२४०३१४९८ /०२२-२४०९०७७०
Email Id: cpfsection@gmail.com
website:www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
भविष्य निर्वाह निधी विभाग
धारावी रोड, मांटुगा (पु) मुंबई ४०० ०१९.

**क्र.लेवि/भनिनि/D/89** दिनांक : 13 MAR 2024

# परिपत्रक क्र. २३०

**विषय :–** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी ट्रस्टची वर्तमानपत्रातील बातमी संदर्भात.

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व इतर कायदा १९५२ नुसार , महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी (भ.नि.नि.) ट्रस्ट हे "ना नफा ना तोटा" हया तत्वावर कार्यान्वित आहे. या कायदया नुसार ट्रस्टने केलेली गुंतवणुक ही श्रम व रोजगार विभाग मंत्रालय, भारत सरकार यांनी निर्गमित केलेल्या अधिसुचना दिनांक ०९ जून २०१५ नुसार गुंतवणूक नमुना (Investment Pattern) यामध्ये निर्देशित केलेल्या अटी व शर्ती यांचे तंतोतंत पालन करुन केली जाते. सदर गुंतवणुक ही म.रा.वि.मं भविष्य निर्वाह निधी ट्रस्ट चे अध्यक्ष , प्रशासन प्रतिनिधी विश्वस्त व कर्मचारी संघटना प्रतिनिधी विश्वस्त यांची संयुक्त बैठक घेवून विचार विनियम करुनच केली जाते.

कंपन्यांचे वार्षिक ताळेबंद अहवाल व आर.बी.आय रजिस्टर रेटिंग ऐजन्सी यांनी दिलेली रेटिंगची छाननी करुनच गुंतवणुक केली जाते. ट्रस्टने केलेल्या गुंतवणुकीवर मिळणारा निधी हा पुरेसा असुन वीज कर्मचाऱ्यांची पीएफची गुंतवलेली रक्कम व्याजा सहित वेळेत देण्यात काही अडचण नाही. त्याअनुषंगाने वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांमुळे संभ्रमित होऊ नये. तसेच, म.रा.वि. सुत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या कंपन्यांच्या एकत्रित पाठींब्याने म.रा.वि.मंडळ भनिनि ट्रस्ट सक्षम पणे कार्यान्वित असुन कर्मचाऱ्यांची पीएफ रक्कम हि पुर्णपणे सुरक्षित आहे.

हे प्रशासकीय परिपत्रक भ.नि.नि.वि.न्यासाच्या संकेतस्थळावर (CPF Portal) उपलब्ध करण्यात आले आहे.

सचिव
तर्फे म.रा.वि.मं.भ.नि.नि ट्रस्ट